**वन्यप्राण्यांपासून पिकांचे, फळझाडांचे झालेले नुकसान आणि मनुष्य व पाळीव प्राण्याच्या झालेल्या हानीसाठी नुकसान भरपाई देण्याबाबत...**

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी- १०.०८/प्र.क्र.२७०/फ-१
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०२.०७.२०१०.

पहा : १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.डब्ल्यूएलपी- १०९४/प्र.क्र.११५/फ-१,दि. २३/८/२००४,
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.डब्ल्यूएलपी-१००४/प्र.क्र.२१९/फ-१,दि.२/६/२००६,
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.डब्ल्यूएलपी-१००२/ प्र.क्र.२५८/फ-१, दि.१७/१/२००३,
४) शासन निर्णय,महसूल व वन विभाग, क्र.डब्ल्यूएलपी-१००२/ प्र.क्र.२५८/फ-१, दि.२०/५/२००३,
५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.डब्ल्यूएलपी-१००१/प्र.क्र.२२०/फ-१, दि.७/७/२००४.

**प्रस्तावना :-**

वन्यप्राण्यांकडून शेतपिकांचे नुकसान झाल्यास दि. २३.८.२००४ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करण्यात येते. सदर आर्थिक मदत कमी असल्यामुळे वन्यप्राण्यापासून होणाऱ्या नुकसानभरपाईमध्ये समुचित वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती तसेच यासाठी वन्यप्राण्यांपासून पिकांचे, फळझाडांचे, मनुष्य व पशुधनाच्या झालेल्या नुकसानभरपाईबाबत सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

अ) राज्यातील **रानडुक्कर, हरिण (सारंग व कुरंग), रानगवा, रोही (निलगाय), माकड** तसेच **वन्यहत्ती** या वन्यप्राण्यांपासून शेतातील पिकांच्या नुकसानीची भरपाई खालीलप्रमाणे आणि पद्धतीने देण्यात यावी.

| अ.क्र. | बाब | द्यावयाची आर्थिक मदत |
|---|---|---|
| १ | नुकसान रु.२०००/- पर्यंत झाल्यास | पूर्ण परंतु किमान रु. ५००/- |
| २ | नुकसान रु २,००१/- ते १०,०००/- पर्यंत झाल्यास | रु.२०००/- अधिक त्यापेक्षा जास्तीच्या नुकसानीच्या ५० % रक्कम (रु.६,०००/- चे कमाल मर्यादेत) |
| ३ | नुकसान रु.१०,०००/- पेक्षा जास्त झाल्यास | रु.६०००/- अधिक रुपये १०,०००/- पेक्षा जास्त नुकसानीच्या ३०% रक्कम (रुपये १५,०००/- चे कमाल मर्यादेत) |
| ४ | ऊस | रु.४०० प्रती मे.टन |

**त्याचप्रमाणे** वन्यहत्ती व रानगवे यांनी फळबागांच्या केलेल्या नुकसानीबाबत खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात यावे.

| बाब | | द्यावयाची आर्थिक मदत |
|---|---|---|
| फळझाडे | नारळ | रु.२,०००/- प्रति झाड |
| | सुपारी | रु.१,२००/- प्रति झाड |
| | कलमी आंबा | रु.१,६००/- प्रति झाड |
| | केळी | रु.४८/- प्रति झाड |
| इतर फळझाडे | | रु.२००/- प्रति झाड |

१. पिक नुकसानीची तक्रार अधिकारक्षेत्र असलेले नजीकचे वनरक्षक, वनपाल अगर वनपरिक्षेत्राधिकारी यांचेपैकी कोणाकडेही घटना घडल्यापासून तीन दिवसात करावी.

२. त्याची शहानिशा संबंधित वनपाल, सरपंच, ग्रामसेवक/तलाठी व कृषी अधिकारी/फलोत्पादन अधिकारी या चार सदस्यांच्या समितीमार्फत १० दिवसांच्या आत करण्यात येईल. त्यासाठी जागेवर जाऊन पंचनामा करणे, नुकसान क्षेत्राची मोजणी करणे, पुरावे तपासणे व नुकसानीचे मूल्य ठरविणे हे या समितीकडून अपेक्षित आहे.

३. प्रत्येक प्रकरणी नुकसान भरपाई देण्याचे आदेश संबंधित उपवनसंरक्षक यांनी घटनेच्या तारखेपासून ३० दिवसांचे आंत काढावे.

४. उपवनसंरक्षक यांनी आदेश काढल्यानंतर एक महिन्याचे आंत बाधित व्यक्तीस रकमेचा रेखांकित धनादेश हस्तांतरीत करावा.

५. ऊस पिकाचे नुकसानीसाठी रु.४०० प्रती मे.टन असे वजनावर आधारीत न ठेवता ज्या तालुक्यामध्ये ऊस पिकाचे नुकसान होईल त्या तालुक्याच्या मागील ८ वर्षाची कृषी विभागाने काढलेल्या उसाच्या उत्पादकतेवरून सरासरी उत्पादकता काढावी व त्यानुसार ऊस पिकाची नुकसान भरपाई क्षेत्रावर आधारीत उत्पादकतेनुसार (प्रती मे.टन रु.४००/- प्रमाणे गणना करून) देण्यात यावी.

६. ज्या व्यक्तींना पीक संरक्षणार्थ बंदूक परवाने देण्यात आले आहेत अशा व्यक्तींच्या शेतीची नुकसान भरपाई विहीत दराने वन्यहत्ती किंवा रानगवा किंवा इतर वन्यप्राणी यांना इजा किंवा त्यांची शिकार संबंधीताकडून झाली नसल्यास अनुज्ञेय राहील.

७. ही मदत प्रती हेक्टरी न राहता प्रत्यक्षात झालेल्या नुकसानीवर अवलंबून राहील.

८. सदरची मदत कसत असलेल्या शेतक-यास / मालकास देय राहील.

९. सदर आर्थिक मदत ही या संदर्भात शासन निर्णय निर्गमित झाल्यापासूनच्या प्रकरणांमध्ये लागू करण्यात यावी.

**<u>खालील प्रकरणे नुकसानभरपाईसाठी अपात्र राहतील .</u>**

१) वनजमिनीवर अतिक्रमणाद्वारे करण्यात येणारी शेती

२) भारतीय वन अधिनियम किंवा वन्यजीव (संरक्षण) अधिनियमांतर्गत ज्यांचे विरुध्द गुन्हा नोंदविला गेला आहे अशा व्यक्तीची शेती.

३) ज्या कुटुंबाची ४ पेक्षा अधिक गुरे मुक्त चराईसाठी जंगलात जातात त्या कुटुंबाची शेती.

४) मागील एक महिन्याचे काळात वन्यप्राण्यांच्या शिकारीची घटना झालेली गांवे.

**ब) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे व्यक्ती जखमी/मृत आणि पशुधनाची झालेली हानी -** वाघ, बिबट्या, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, हत्ती, मगर व रानकुत्रे (ढोल) यांच्या हल्ल्यामुळे व्यक्ती जखमी/मृत झाल्यास किंवा पशुधनाचा मृत्यू झाल्यास खालील प्रमाणे आणि अटींवर नुकसान भरपाई देण्यात यावी.

i) **व्यक्ती जखमी/मृत झाल्यास**

| अ.क्र. | तपशील | देय अर्थसहाय्याची रक्कम |
|---|---|---|
| १ | व्यक्ती मृत झाल्यास किंवा कायमचे अपंगत्व आल्यास | रु. २,००,०००/- (रु. दोन लाख फक्त ) |
| २ | व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्यास | रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) |
| ३ | व्यक्ती किरकोळ जखमी झाल्यास | औषधोपचारांसाठी येणारा खर्च देण्यात यावा. मात्र खाजगी रुग्णालयात औषधोपचार करणे अगत्याचे असल्यास त्याची मर्यादा रु. ७,५००/- (रु. सात हजार पाचशे फक्त) प्रती व्यक्ती अशी राहील. शक्यतो औषधोपचार शासकीय / जिल्हा परिषद रुग्णालयात करावा. |

**अटी :-**

१) वन्यप्राण्यांकडून झालेला हल्ला हा सदर व्यक्तीने वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतूदींचा भंग करताना झालेला नसावा.

२) हल्ला झालेल्या व्यक्तीने अथवा त्यांच्या नातेवाईक / मित्रांनी हल्ला झाल्यापासून ४८ तासांच्या आत नजिकच्या वन अधिकाऱ्याला / कर्मचाऱ्याला कळवावे.

३) हल्ला झाल्यापासून तीन दिवसांच्या आत स्थानिक पोलीस अधिकारी अथवा वनाधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन झालेल्या हल्ल्याचा पंचनामा करावा. पंचनामा करणारा अधिकारी पोलीस उपनिरीक्षक वा वनक्षेत्रपाल यांच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसावा.

४) वन्यप्राण्यांकडून झालेल्या हल्ल्यामुळे सदर व्यक्ती मृत अथवा जखमी झाली हे तपासण्याकरिता देण्यात येणारे वैद्यकीय प्रमाणपत्र सक्षम राजपत्रित वैद्यकीय अधिकारी, जो शासकीय रुग्णालयाचा प्रमुख आहे व ज्याचा दर्जा वैद्यकीय अधिकाऱ्याच्या (मेडीकल ऑफिसर) खालचा नाही असा अधिकारी प्रमाणपत्र देण्यास सक्षम अधिकारी मानला जावा.

५) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे मृत व्यक्तीकरिता द्यावयाचे आर्थिक सहाय्य त्या व्यक्तीच्या कायदेशीर वारसालाच (Legal Heir) देण्यात यावे.

६) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे जखमी झालेल्या व्यक्तीला देण्यात येणारी आर्थिक सहाय्याची रक्कम खुद्द जखमी व्यक्तीलाच देण्यात यावी.

७) जखमी झालेल्या व्यक्तीला अथवा मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसाला देण्यात येणारी आर्थिक सहाय्याची रक्कम मंजूर करणारा अधिकारी उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी या वनाधिकाऱ्यांच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसावा.

८) अर्थसहाय्याची रक्कम केवळ रेखांकित धनादेशाद्वारे अदा करण्यात यावी.

ii) **पशुधनाचा मृत्यू / अपंग / जखमी झाल्यास**

| अ.क्र. | पशुधनाचे (पाळीव प्राण्याचे) नाव | देय अर्थसहाय्याची रक्कम |
|---|---|---|
| १ | गाय, म्हैस, बैल यांचा मृत्यू झाल्यास | बाजार भाव किंमतीच्या ७५ % किंवा रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त) यापैकी कमी असणारी रक्कम |
| २ | मेंढी, बकरी व इतर पशुधन* यांचा मृत्यू झाल्यास {*वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील कलम २ (१८-अ) प्रमाणे } | बाजार भाव किंमतीच्या ७५ % किंवा रु. ३,०००/- (रु. तीन हजार फक्त) यापैकी कमी असणारी रक्कम. |
| ३ | गाय, म्हैस , बैल या जनावरांना कायम अपंगत्व आल्यास | बाजार भाव किमतीचे ५० % किंवा रु.३०००/- (रुपये तीन हजार फक्त) या पैकी कमी असणारी रक्कम. |
| ४ | गाय, म्हैस, बैल, मेंढी,बकरी व इतर पशुधन जखमी झाल्यास | औषधोपचारासाठी येणारा खर्च देण्यात यावा. औषधोपचार शासकीय / जिल्हा परिषद पशुचिकित्सालयात करणेत यावा. देय रक्कम मर्यादा बाजार भावाचे २५ टक्के किंवा रु.१००० (एक हजार फक्त) प्रति जनावर यापैकी कमी असणारी रक्कम. उक्त नुकसान भरपाई पशुवैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राचे आधारे देण्यात यावी. |

**<u>सदर अर्थसहाय्य खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अनुज्ञेय असेल.</u>**

१) जनावर मालकाने जनावर मेल्यापासून किंवा घटना घडल्यापासून ४८ तासाच्या आत जवळील वन अधिकाऱ्याला / कर्मचाऱ्याला कळविले पाहिजे.

२) वन्यप्राण्याने ज्या ठिकाणी जनावर मारले असेल त्या ठिकाणावरुन जनावराचे शव लोकांनी हलविता कामा नये.

३) जनावराचा ज्या ठिकाणी मृत्यू / जनावर जखमी / अपंग झाले असेल त्या ठिकाणापासून १० कि.मी. भागात कोणत्याही वन्यप्राण्याचा ६ दिवसापर्यंत विष देऊन मृत्यू झालेला नसावा.

४) हल्ल्याची बातमी मिळाल्यानंतर संबंधित वनपाल यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन तातडीने पंचनामा करावा. तथापि जनावराचा मृत्यू कोणत्या वन्यप्राण्याचे हल्ल्याने झाला याची तपासणी वनक्षेत्रपाल दर्जाच्या अधिकाऱ्याकडून करण्यात येऊन द्यावयाची नुकसान भरपाई रक्कमही त्यांचेकडून ठरविण्यात यावी.

५) जनावर मालकाला देण्यात येणारी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करणारा अधिकारी उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसावा.

६) संबंधितास देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याची रक्कम रेखांकित धनादेशाद्वारे देण्यात यावी.

**क) गिधाडांद्वारे होणाऱ्या नारळांची नुकसान भरपाई :-** गिधाडांद्वारे प्रजननासाठी नारळाच्या झाडांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असल्याने घरट्यामधील गिधाडाच्या विष्ठेमुळे नारळाचे उत्पन्न घटते व शेतकऱ्यांचे नुकसान होते. त्यामुळे शेतकरी अशा झाडांवर असलेली घरटी नष्ट करतात व पर्यायाने त्यामुळे गिधाडाची अंडी - पिल्ले नष्ट होतात. गिधाडांची घरटी असलेल्या नारळ झाडासाठी प्रती हंगाम खालीलप्रमाणे व पुढील अटींवर नुकसान भरपाई देण्यात यावी :-

१) नारळाचे मागील हंगामातील प्रती झाड उत्पादन संबंधित कृषि अधिकाऱ्यांकडून उपलब्ध करुन घ्यावे. त्यानुसार ज्या झाडावर गिधाडाचे घरटे असेल त्या झाडाच्या उत्पादनात चालू हंगामात झालेली घट विचारात घेऊन प्रति नारळ रु. ७/- प्रमाणे नुकसान भरपाई परिगणीत करण्यात यावी.

२) देण्यात येणारी नुकसान भरपाई प्रति हंगाम प्रति झाड रु. ४००/- पेक्षा अधिक असता कामा नये.

३) गिधाडाचे घरटे नारळाचे झाडावर असल्याचे आढळल्यावर शेतमालकाने तसे स्थानिक वनपरिक्षेत्र कार्यालयास कळवावे. सदर बाबीची वनक्षेत्रपाल दर्जाच्या अधिकाऱ्याने खात्री केल्यावर नुकसान भरपाईचे मान्यतेबाबतचा निर्णय संबंधित उपवनसंरक्षक यांच्या मान्यतेनंतर अर्जदारास कळविण्यात येईल.

४) गिधाडांच्या विणीचा हंगाम संपेपर्यंत शेतमालकाने घरट्यास संरक्षण द्यावे. याबाबत पाहणी करून खात्री झाल्यावर नुकसान भरपाई देण्यात येईल.

५) अर्थसहाय्याची रक्कम केवळ रेखांकित धनादेशाद्वारे अदा करण्यात यावी.

**ड)** उपरोक्त दि. २३/८/२००४, दि.२/६/२००६, दि. १७/१/२००३, दि.२०/५/२००३ **व** दि.७/७/२००४ चे शासन निर्णय प्रस्तुतचा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अधिक्रमित करण्यात येत आहेत.

**इ)** सदर शासन निर्णय, निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(शिरीष राणे)**
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रत माहिती आणि उचित कार्यवाहीसाठी

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे प्रधान सचिव.
मा.उपमुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे सचिव.
मा.मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री (वने), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व प्रसिध्दी, मंत्रालय, मुंबई.
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा.नागपूर,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, नागपूर.
संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, म.रा. पुणे
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व
मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर /मुंबई (बोरीवली)/नाशिक
वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे / कोल्हापूर / नाशिक
वनसंरक्षक, कोल्हापूर, उत्तर चंद्रपूर, दक्षिण चंद्रपूर.
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर
सर्व पोलिस आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
उपवनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे/गोंदिया/अकोला/आलापल्ली चंद्रपूर स्थित/औरंगाबाद
उपविभागीय वन अधिकारी, सांगली/उस्मानाबाद/बीड/भोर/चिपळूण/संगमनेर/मालेगाव/हिंगोली.
सर्व पोलिस अधीक्षक
सर्व जिल्हा कृषी अधिकारी

महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य , मुंबई / नागपूर
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
वित्त विभाग (व्यय-१० कार्यासन), मंत्रालय, मुंबई - ३२.
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
वन कक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).